**MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDYALAYA, DARWHA**

**Session 2016-17**

**7.2.1 Describe two best practices successfully implemented by the Institution as per NAAC format provided in the Manual.**

## Best practice I

### SOCIAL SERVICE THROUGH BLOOD DONATION



श्री. वसंतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय
व रूग्णालय, रक्तपेढी विभाग, यवतमाळ

सन्मानपत्र

आपणातर्फे दि. 19/09/2016 रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात 27 युनिट रक्त संकलन करण्यात आले आहे.

आपणाकडून लाभलेल्या ह्या सात्विक दानाच्या प्रित्यर्थ श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय रक्तपेढी विभागाच्या वतीने आपणास हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

सहयोगी प्राध्यापक
रक्तपेढी प्रमुख
श्री.व.ना.शा.वै.महा.
यवतमाळ

प्राध्यापक व विभाग प्रमुख
विकृती शास्त्र विभाग
श्री.व.ना.शा.वै.महा.
यवतमाळ

*Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp Session 2016-17*





*Students Donated blood in cam*

**Session 2017-2018**




*Blood Donation Camp Inauguration*



*NSS Volunteer Donating Blood in Blood Donation Camp*



लोकमत

# दारव्हा येथे रक्तदान शिबिराला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे सोमवारी रक्तदान शिबिर घेण्यात आले.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विलास राऊत होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, डॉ.सुनील चकवे, डॉ.संतोष चतूर, डॉ.यादव सोळंके, प्रा.सुनील डंभारे, प्रा.संदीप भुरले, प्रा.नितीन भिंगारे उपस्थित होते. यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तसंकलन केंद्राचे डॉ.स्मिता गवळी, मोबीन दुंगे, राहुल भोयर, डोळस यांनी रक्त संकलन केले. सुरुवातीला संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर फित कापून शिबिराचे उद्घाटन झाले.

दारव्हा येथे शिबिरात रक्तदान करताना रासेयोचे स्वयंसेवक.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर यांनी रक्तदानाचे महत्त्व विषद करून रक्तदात्यांचे कौतुक केले. महाविद्यालयातील ४५ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. त्यात विद्यार्थिनींचाही सहभाग होता. संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत, प्रास्ताविक डॉ.मनीष मोहरील, तर आभार प्रा.अखतरउन्नीसा कुरेशी यांनी केले. या शिबिराला प्रा.संदीप भुरले, प्रा.प्रियंका रुईकर, विकास पाईकराव, मेहूल गोहेल, रासयो स्वयंसेवकांनी सहकार्य केले. या शिबिरात अनेकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

Hello Yavatmal
Page No. 3 Mar 07, 2018
Powered by: erelego.com

# मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे रक्तदान शिबिर



*शहर प्रतिनीधी/* ८मार्च

**दारव्हा:** स्थानीक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे ५ मार्चला विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतरावजी घुईखेडकर यांच्या वाढदिवसाचे औचीत्य साधुन राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास राऊत तर प्रमुख उपस्थितीमध्ये श्री.वसंतराव घुईखेडकर,कला शाखेचे प्रमुख डॉ.सुनिल चक्वे, डॉ.संतोष चतुर, डॉ.यादव सोळंके, प्रा.सुनिल डंभारे, प्रा.संदीप भुरले, प्रा.नितीन भिंगारे उपस्थित होते. तसेच वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रक्त संकलन केन्द्राचे डॉ.स्मिता गवळी, मोबीन दुंगे, राहुल भोयर, डोळस उपस्थित होते.

यावेळी वंसतराव घुईखेडकर यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या ४५ विद्यार्थ्यांनी यावेळी रक्तदान केले. कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत यांनी तर प्रास्तावीक डॉ.मनिष मोहरिल यांनी केले. महीला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. कुरेशी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

ePaper देशोन्नती Fri, 09 March 2018
deshonnati.digitaledition.in//c/26880853

# मुंगसाजी महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**सकाळ वृत्तसेवा**

**दारव्हा, ता. ७ :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, कला शाखाप्रमुख डॉ. सुनील चकवे, डॉ. संतोष चतुर, डॉ. यादव सोळंके, प्रा. सुनील डंभारे, प्रा. संदीप भुरले, प्रा. नितीन भिंगारे आदी व डॉ. स्मिता गवळी, मोबिन दुंगे, राहुल भोयर, डोळस रक्त संकलन केंद्राचे अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयातील ४५ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय कार्यात सहभाग घेतला. संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी, प्रास्ताविक डॉ. मनीष मोहरील यांनी तर आभार महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अखतरउन्नीसा कुरेशी यांनी मानले. यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. विलास राऊत यांचे मार्गदर्शनात डॉ. शंकर सावंत, डॉ. मनीष मोहरील, प्रा. संदीप भुरले, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. अखतरउन्नीसा कुरेशी, वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालयाची व रासेयो स्वयंसेवकांमध्ये विकास पाईकराव व मेहूल गोहेल यांनी पुढाकार घेतला.

# दारव्हा येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**दारव्हा** | येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागद्वारे विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर यांचे वाढदिवस निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विलास राऊत तर प्रमुख उपस्थिती वसंत घुईखेडकर, डॉ.सुनिल चकवे, डॉ.संतोष चतुर, डॉ.यादव सोळंके, प्रा.सुनील डंभारे, प्रा.संदिप भुरले, प्रा.नितीन भिंगारे , डॉ.स्मिता गवळी, मोबीन दुंगे, राहुल भोयर, डोळस रक्त संकलन केंद्र, वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ उपस्थित होते. सुरूवातील संत गाडगेबाबा यांचे प्रतिमा पूजन करून हार अर्पण करण्यात आला. यानंतर शिबिराचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत यांनी, प्रास्तविक डॉ.मनीष मोहरील यांनी तर आभार प्रा.अखतरउन्नीसा कुरेशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता प्राचार्य डॉ.विलास राऊत यांचे मार्गदर्शनात डॉ.शंकर सावंत, प्रा.संदीप भुरले, प्रियंका रूईकर, विकास पाईकराव, मेहुल गोहेल यांनी सहकार्य केले.

*Blood Donation Camp News Published By Lokmat And Deshonnati, Sakal And Divya Marathi News Paper*




*Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp   Session 2017-18*




*Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp   Session 2017-18*

**Session 2018-2019**




*Blood Donation Camp Inauguration*



*College Students Donating Blood in Blood Donation Camp*

लोकमत



शिबिरात रक्तदान करताना विद्यार्थी व उपस्थित घुईखेडकर, शेळके आदी.

## दारव्ह्यात १०४ जणांचे रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित रक्तदान शिबिरात १०४ दात्यांनी रक्तदान केले.

शिबिराला विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, उत्तमराव शेळके, सुभाष ठोकळ प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांनी फीत कापून शिबिराचे उद्घाटन केले. संत गाडगेबाबा, अमर जवान ज्योती, माजी आमदार बाळासाहेब घुईखेडकर यांना हारार्पण करून रक्तदान शिबिराची सुरुवात झाली. शिबिरामध्ये १०४ दात्यांनी रक्तदान करून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली.

शहरातील विविध सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराला स्व.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळच्या रक्तपेढी विभागाचे डॉ.सुमित डांगे, गणेश कानडे, प्रदीप वाघमारे, सुशील ताकतांडे, भाऊ धारशिंबे, भाऊ ठाकरे, भाऊ जाधव यांनी सहकार्य केले. यशस्वीतेसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ.संगीता घुईखेडकर, मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात डॉ.शंकर सावंत, डॉ.अरविंद लाडोळे, डॉ.सुनील चकवे, डॉ.सुभाष जाधव, प्रा.संदीप भुरले, प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.अख्तरउन्नीसा कुरेशी, डॉ.मनीष मोहरील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले. शिबिरात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

*Blood Donation Camp News Published By Lokmat News Paper*

मंगळवार दि. ५ मार्च २०१९
epaper.-deshonnati.com

थोडक्यात

## आज दारव्हा येथे भव्य रक्तदान शिबिर

दारव्हा : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय यांचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारे आज ५ मार्च २०१९ रोजी पुलवामा शहिदांना श्रद्धांजली व वसंतराव घुईखेडकर यांच्या वाढदिवसा निमित्त्य भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जखमी जवानांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे यासाठी बचत भवन दारव्हा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. त्यामुळे जनतेने या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत तसेच रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले आहे.

ePaper देशोन्नती Tue, 05 Mar
https://desl

## दारव्हा येथे आज रक्तदान शिबिर

दारव्हा : 'दान करा रक्ताचे-सार्थक होईल जीवनाचे, दोन थेंब रक्ताचे-जीवन देईल मोलाचे', या विचारधारेवर आधारित येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे पुलवामा शहिदाना श्रद्धांजली वाहण्यात आली. सोबतच वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त येथील बचत भवनात मंगळवारी (ता. ५) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. गेल्या फेब्रुवारीत पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात आपले जवान शहीद झालेत. ज्यांनी आपले रक्त सांडून देशाचे पर्यायाने आपले रक्षण केले. या जवानांना व देशाच्या रक्षणकर्त्यांना अभिवादन करण्यासाठी, सोबत राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्यासाठी आपण आपले थोडेसे रक्तदान करू या. राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने पुलवामा शहिदांना श्रद्धांजली व विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (ता. ५) सकाळी दहा ते दोन या वेळेत येथील बचत भवनात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी शासकीय जिल्हा रुग्णालयाचे विशेष सहकार्य राहणार आहे. रक्तदान हे महादान असून, या पुण्यकार्यात नागरिकांनी सहभागी व्हावे व रक्तदान करावे, असे आवाहन मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने करण्यात आले आहे.

*Blood Donation Camp News Published By Sakal, Deshonnati News Paper*



दारव्हा : येथील बचत भवन येथे रक्तदान शिबिरात रक्तदान करताना रक्तदाता व उपस्थित मान्यवर.

## दारव्हा येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे पुलवामा येथील भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली, सोबतच विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (ता. ५) रक्तदान शिबिर घेण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष उत्तम शेळके, माजी सभापती सुभाष ठोकळ व वसंत घुईखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्या रक्तपेढी विभागाद्वारे सुमित डांगे, गणेश कानडे, प्रदीप वाघमारे, सुशील ताकतांडे, धारशिंबे, ठाकरे, जाधव आदींच्या चमूने सहकार्य केले. या रक्तदान शिबिरामध्ये १०४ रक्तदात्यांनी रक्तदान करून देशाच्या सीमेवर तैनात सैनिकांच्या कार्याला, शहीद जवानांना रक्तदानाच्या माध्यमातून मानवंदना दिली. या रक्तदान शिबिरामध्ये शहरातील विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. शिबिरासाठी मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या मार्गदर्शन डॉ. शंकर सावंत, डॉ. अरविंद लाडोळे, डॉ. सुनील चकवे, डॉ. सुभाष जाधव, प्रा. संदीप भुरले, प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. अख्तर रूणिसा कुरेशी, डॉ. मनीष मोहरील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

***Blood Donation Camp News Published By Sakal News Paper***

# दारव्हा येथे रक्तदान शिबिर



***शहर प्रतिनिधी* / ५ मार्च**

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे सीआरपीएफच्या शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी व विद्या प्रसारक मंडळ दारव्हाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ५ मार्च रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. याप्रसंगी उत्तमराव शेळके व वसंत घुईखेडकर यांनी फीत कापून शिबिराचे उद्घाटन केले. रक्तदान शिबिरामध्ये वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्या रक्त पेढी विभागाद्वारे डॉ. सुमित डांगे, गणेश कानडे, प्रदीप वाघमारे, सुशील ताकतांडे, धारशिंबे, ठाकरे, जाधव या चमूने सहकार्य केले. शिबिरा दरम्यान १०४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

ePaper देशोन्नती Wed, 06 March 2019
https://deshonnati.digitaledition.:

***Blood Donation Camp News Published By Deshonnati News Paper***



श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय
व रुग्णालय, रक्तपेढी विभाग, यवतमाळ

सन्मानपत्र

मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा जि. यवतमाळ

आपणातर्फे दि. ५/३/२०१९ रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात ८१ युनिट रक्त संकलन करण्यात आले आहे.

आपणाकडून लाभलेल्या ह्या सात्विक दानाच्या प्रित्यर्थ श्री. व. ना. शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय रक्तपेढी विभागाच्या वतीने आपणांस हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

सहयोगी प्राध्यापक
रक्तपेढी प्रमुख
श्री. व. ना. शा. वै. महा.
यवतमाळ

प्राध्यापक व विभाग प्रमुख
विकृती शास्त्र विभाग
श्री. व. ना. शा. वै. महा.
यवतमाळ

*Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp   Session 2018-19*





रक्तपेढी, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ

सन्मानपत्र

श्री/श्रीमती मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा

आपण स्वैच्छिक रक्तदान मोहीमे मध्ये गेल्या अनेक दिवसां पासून सहभागी राहून ऐच्छिक रक्तदान वाढविण्या करिता मोलाचे योगदान दिले. अनेकदा रक्तदान शिबिराचे आयोजन करून रक्तपेढीस सहकार्य केले या मोलाच्या योगदाना बद्दल आपणास हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे.

रक्तपेढी प्रमुख व सहा. प्राध्यापक
विकृतीशास्त्र विभाग
श्री. व. ना. शा. वै. महा. व रुग्णालय यवतमाळ

प्राध्यापक व विभाग प्रमुख
विकृतीशास्त्र विभाग
श्री. व. ना. शा. वै. महा. व रुग्णालय, यवतमाळ

*Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp   Session 2018-19*

**Session 2019-2020**

## 3/3/2020 Blood Donation Camp




*Blood Donation Camp Inauguration*



*College Students Donating Blood in Blood Donation Camp*

लोकमत

# दारव्हा येथे रासेयोतर्फे रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा शासकीय रुग्णालय रक्त संकलन केंद्रातर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आले.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे होते. डॉ. सुभाष जाधव, डॉ. किशोर हुरडे, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. संदीप भुरले, डॉ. नितीन भिंगारे, प्रा. प्यारेलाल भागवत, प्रा. सुनील डंभारे, प्रा. चेतन पवार, डॉ. सुषमा गावंडे, डॉ. नाझिया रशिदी, डॉ. फरहाना आझमी शेख, जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी विभागाच्या जागृती पालव, रक्त संक्रमण अधिकारी मोबीन दुंगे, समाज सेवा अधिकारी प्रदीप वाघमारे, तंत्रज्ञ आदर्श खडककर, कशीराज मांडवकर, दिलीप केराम, विशाल बडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



रक्तदान करताना रासेयो स्वयंसेवक आणि युवक.

गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व फित कापून रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. डॉ. सुनील चकवे यांनी रक्तदानाचे महत्त्व विषद केले. शिबिरात ३१ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. संचालन रासेयो स्वयंसेविका श्रेया काळे, प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, तर आभार प्रवीण सुलताने यांनी मानले. प्राचार्य डॉ. विलास राऊत, विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात रासेयोचे डॉ. मनीष मोहरील, प्रा. प्रियंका रुईकर, डॉ. अख्तररुन्निसा कुरेशी, स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Mar 08, 2020
Powered by: erelego.com

*Blood Donation Camp News Published By Lokmat News Paper*

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | दारव्हा

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व यवतमाळ जिल्हा शासकीय रुग्णालयाचे रक्त संकलन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ५ मार्च रोजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले.

रक्तदान शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे तर प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. सुभाष जाधव, डॉ किशोर हुरडे, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. संदीप भुरले, डॉ. नितीन भिंगारे, प्यारेलाल भागवत, सुनील डंभारे, प्रा. चेतन पवार, डॉ सुषमा गावंडे, डॉ. नाझिया रशिदी, डॉ. फरहाना आझमी शेख तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी विभागाचे जागृती पालव, रक्त संक्रमण अधिकारी, मोबीन दुंगे, समाज सेवा अधिकारी, प्रदीप वाघमारे, तंत्रज्ञ, आदर्श खडककर, तंत्रज्ञ, कशीराज मांडवकर, कधी परिचारक, दिलीप केराम, प्रयोगशाळा सहाय्यक,



विशाल बडे, वाहन चालक आदी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण केला व फीत कापून रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी रक्तदानाचे महत्त्व विषद करताना रक्तदान श्रेष्ठ दान असून या पुण्य कार्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सदैव तत्पर राहावे असे आव्हान केले. रक्तदान शिबिरामध्ये महाविद्यालयातील ३१ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. या ३१ विद्यार्थ्यांमध्ये आर्ट फॅकल्टी मधून १७ विद्यार्थ्यांनी तर कॉमर्स फॅकल्टी मधून सात विद्यार्थ्यांनी तर सायन्स फॅकल्टी मधून सात विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेविका श्रेया काळे तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय स्वयंसेवक प्रवीण सुलताने यांनी व्यक्त केले. यशस्वितेकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत व विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, डॉ. मनीष मोहरील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रूईकर, डॉ. अख्तर रून्निसा कुरेशी यांनी तसेच रासेयोच्या स्वयंसेवक व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. सोबतच रक्त संकलन केंद्र जिल्हा शासकीय रुग्णालय यवतमाळच्या चमूचे रक्तदान शिबिर आखता अमूल्य असे सहकार्य लाभले.

दिव्य मराठी विशेष • सिद्धांत राठोड यांचे मनोगत; जनता विद्या

*Blood Donation Camp News Published By Divya Marathi News Paper*




*Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp   Session 2019-20*




*Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp   Session 2019-20*

**Session 2020-2021**

## 20/12/2020 Blood Donation Camp




*Blood Donation Camp*




*College Students Donating Blood in Blood Donation Camp*



# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात रक्तदान

प्रतिनिधी | दारव्हा

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे २० डिसेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना द्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. कोरोना प्रभावामुळे निर्माण झालेल्या रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांचा स्नेहानुबंध उपक्रमांतर्गत अमरावती विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांनी रक्तदान शिबिरे आयोजित करावी असे आव्हान राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेश बुरंगे व विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले होते. या आव्हानाला प्रतिसाद म्हणून महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या हेतूने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील २७ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी व राष्ट्र संकटात मदत करण्याचा वसा जोपासला. या रक्तदान शिबिरासाठी वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रक्तपेढी, यवतमाळ येथील डॉ. उन्मेश देव, डॉ. गणेश कानडे, प्रतिक मोटे, रामदास आगलावे, सुशील टाकसांडे, अमीर पठाण, किशोर जुमळे आदींनी सहकार्य केले. शिबिराचे उद्घाटन डॉ. गणेश कानडे वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालय, यवतमाळ यांनी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील तर आभार प्रदर्शन प्रा. धनश्री कोठेकर, प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे तर रक्तदानाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत व विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव संगीता घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, प्रा.धनश्री कोठेकर, डॉ. संदीप भुरले, डॉ. जुगलकिशोर धोटे, अशोक ढोक, सुनील अगमे, संतोष इंगळे, गौतम भगत आदींनी परिश्रम घेतले.

***Blood Donation Camp News Published By Divya Marathi News Paper***



श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय
व रुग्णालय, रक्तपेढी विभाग, यवतमाळ

सन्मानपत्र

मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा, जि. यवतमाळ

आपणातर्फे दि. २०/१२/२०२० रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात २७ युनिट रक्त संकलन करण्यात आले आहे.

आपणाकडून लाभलेल्या ह्या सात्विक दानाच्या प्रित्यर्थ श्री. व. ना. शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय रक्तपेढी विभागाच्या वतीने आपणांस हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

सहयोगी प्राध्यापक
रक्तपेढी प्रमुख
श्री. व. ना. शा. वै. महा.
यवतमाळ

प्राध्यापक व विभाग प्रमुख
विकृती शास्त्र विभाग
श्री. व. ना. शा. वै. महा.
यवतमाळ

***Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp Session 2020-21***


A SINGLE PINT CAN SAVE THREE LIVES A SINGLE GESTURE CAN CREATE A MILLION SMILES

रक्तपेढी, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ

सन्मानपत्र

श्री / श्रीमती मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा
आपण स्वैच्छिक रक्तदान मोहीमे मध्ये गेल्या अनेक दिवसां पासून सहभागी राहून ऐच्छिक रक्तदान वाढविण्या करिता मोलाचे योगदान दिले. अनेकदा रक्तदान शिबिराचे आयोजन करून रक्तपेढीस सहकार्य केले या मोलाच्या योगदाना बद्दल आपणास हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे.

रक्तपेढी प्रमुख व सहा. प्राध्यापक
विकृतीशास्त्र विभाग
श्री. व. ना. शा. वै. महा. व रूग्णालय यवतमाळ

प्राध्यापक व विभाग प्रमुख
विकृतीशास्त्र विभाग
श्री. व. ना. शा. वै. महा. व रूग्णालय, यवतमाळ

***Certificate Received For Successful Organization of Blood Donation Camp Session 2020-21***




***Blood Donation Camp Inauguration***




*College students as well as Professors donated blood in camp*

# शिबिरात १०१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

देशोन्नती वृत्तसंकलन...

**दारव्हा** ▪ स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने च्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल १०१रक्त दात्यांनी रक्तदान करून आपला सहभाग नोंदविला.

विद्या प्रसारक मंडळ दारव्हा या संस्थेच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. याच सुवर्ण महोत्सवी वर्षाचे निमित्य साधत राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या करीता विद्या प्रसारक मंडळाचे



अध्यक्ष श्री.वसंत घुइखेडकर, सचिव डॉ. सौ. संगीता घुईखेकडर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी विद्यार्थ्यांना व दारव्हा शहरातील नागरिकांना केलेल्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. श्री. वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय, यवतमाळ यांच्या चमूच्या मदतीने तब्बल १०१ रक्तदात्यांनी रक्तदान करून नवा विक्रम नोंदविला. या रक्तदान शिबिरात महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच दारव्हा शहरातील नागरिकांचा समावेश होता. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी दिलेल्या प्रोत्साहनाने या शिबिराला यश मिळाले. याप्रसंगी वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय, यवतमाळ येथील डॉ. भूषण मेटकर,रक्त संक्रमण अधिकारी, मोबीन दूंगे,समाजसेवा अधिक्षक, वाघमारे, सचिन नायक्वाड, विठ्ठल डोळस, सुरेश सुरोसे यांनी मोलाचे सहकार्य केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत डॉ. अरविंद लाडोळे, डॉ. किशोर हुरडे, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. संतोष चतुर, डॉ. शंकर सावंत, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. सुनिल आखरे, डॉ. संदीप भुरले, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये अशोक ढोक, संतोष इंगळे, सुनील अगमे, गौतम भगत, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, सहायक महिला अधिकारी प्रा. प्रियांका रुईकर, डॉ. अखतेरुन्निसा कुरेशी इत्यादींनी या शिबिराचे आयोजन केले होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आशुतोष चौधरी, ऋतिक बेसूरकर, रोहित येलसटे, रोहित चव्हाण, शुभम चव्हाण, निलेश राठोड, वैभव देशकरी, गणेश होलगरे, नितीन काळे, क्रिष्णा खांडलकर, शिवम मिरापुरे, इत्यादींनी शिबिराच्या यशस्वीतेकरिता परिश्रम घेतले. (श.प्र.)

ePaper देशोन्नती Mon, 27 December 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/65213303

***Blood Donation Camp News Published By Deshonnati Marathi News Paper***

Seal
Mungsaji Maharaj Mahavidyalay * Darwha Dist. Yavatmal *

Principal
Mungsaji Maharaj Mahavidyalay
Darwha Dist.Yavatmal

# Best Practice II

## Vision for carrier for employment opportunities

## 2016-2017




*Inauguration of Programme*








# उद्योजकता विकास कार्यशाळा

दारव्हा : नोकरीला पर्याय म्हणून आज व्यवसायाच्या अनेक संधी आहेत. जिद्द आणि चिकाटी असल्यास त्या सहज उपलब्ध होवू शकते, असे विचार येथे झालेल्या उद्योजकता विकास कार्यशाळेत मान्यवरांनी मांडले. उद्योजकता विकास संस्था गुजराततर्फे ही कार्यशाळा घेण्यात आली.

प्राचार्य डॉ. संगीता घुईखेडकर अध्यक्षस्थानी होत्या. अस्तित्व फाऊंडेशनच्या अध्यक्ष अलका कोथळे उद्घाटक, तर प्रमुख वक्ते म्हणून मंगरूळपीर येथील उद्योजक प्रा. सुधीर घोडचर लाभले होते. डॉ. सुनील चकवे यांनी ही कार्यशाळा घेतली. प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी समयोचित मार्गदर्शन केले. संचालन डॉ. नाझिया रशिदी यांनी, तर आभार प्रा. भुरले यांनी मानले.

शिबिरासाठी डॉ. विलास राऊत, डॉ. चतूर, डॉ. जाधव, डॉ. लाडोळे, डॉ. सावंत, प्रा. भिंगारे, प्रा. वाकोडे, प्रा. भागवत आदींनी पुढाकार घेतला. शिबिराच्या समारोपानंतर विद्यार्थ्यांनी दारव्हा एमआयडीसीतील उद्योगांना भेट दिली. (प्रतिनिधी)

***News Published By Deshonnati Marathi News Paper***

## Coaching Classes for entry in service for SC/ST/OBC & Minorities




Workshop on competitive examination organized by College




Respected Sau. Sangitatai Ghuikhedkar while addressing the students




Respected Vasantbhau Ghuikhedkar while addressing the students



विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा चे संस्थापक अध्यक्ष, सहकार महर्षी तथा माजी आमदार
स्व.बाळासाहेब घुईखेडकर यांच्या जयंती महोत्सवा निमित्त आयोजित

मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा व्दारा आयोजीत

VISION FOR CAREER WORKSHOP

व्हीजन फॉर करिअर
एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय कार्यशाळा

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

श्री/कु. माधुरी पांडुरंग इंगोले वर्ग १२ वा

हे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित व्हिजन फॉर करिअर या एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेत उपस्थित होते.

दिनांक : ०९/०१/२०१७
दारव्हा

डॉ.सौ.संगीता वसंत घुईखेडकर
सचिव,
विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा
जि.यवतमाळ

डॉ. विलास राऊत
प्राचार्य
मुंगसाजी महाराज महाविद्यालय,
दारव्हा जि.यवतमाळ

*Certificate for Participants*



सुवर्ण संधी सुवर्ण संधी सुवर्ण संधी सुवर्ण संधी

विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा चे संस्थापक अध्यक्ष, सहकार महर्षी तथा माजी आमदार स्व.बाळासाहेब घुईखेडकर यांचे जयंती महोत्सवा निमित्त आयोजित

विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा व मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा यांचे संयुक्त विद्यमाने

**VISION FOR CAREER WORKSHOP**

**व्हीजन फॉर करिअर**

**एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय कार्यशाळा**

सोमवार
दि: ०९/१/२०१७

-: स्थळ :-
मुंगसाजी महाराज महाविद्यालय,
दारव्हा जि.यवतमाळ

-: नोंदणी(नि:शुल्क) :-
वेळ : सकाळी १० वा

विद्या शाखा निहाय रोजगाराच्या उपलब्ध संधी, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व रोजगाराच्या संधी मिळविण्याची प्रक्रिया, मुलाखत तंत्र, स्वयंरोजगाराच्या संधी, मॉडर्न बिझिनेस कम्युनिकेशन यावर नागपूर आणि औरंगाबाद येथील तज्ञाचे मार्गदर्शन

-: प्रमुख वक्ते :-

**डॉ.संजय चंद्रकांत रघटाटे**
डायरेक्टर,
ऑक्सफोर्ड स्पिकर ॲकेडेमी, नागपूर

**श्री. मधूर पोफळे**
कोऑर्डीनेटर,
युनिक ॲकेडेमी, औरंगाबाद

तरी पाचही जिल्ह्यातील युवक युवतींनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा.

तसेच युनिक ॲकेडेमी पुणे, तर्फे स्पर्धा परीक्षासंबंधी

**पुस्तक प्रदर्शनी व पुस्तक विक्री वर ४०% सुट**

-: विनीत :-

**डॉ.विलास राऊत**
प्राचार्य,
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

**श्री. वसंत घुईखेडकर**
अध्यक्ष,
विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा

Handbill of *Vision for Career workshop* Programme



academy

3rd Floor, Vasu Chamber, Opp Fergusson College Main Gate, Shivajinagar, Pune - 411004. Ph. : 020-25530950

दिनांक : / /२०१६

मा. प्राचार्य,

विषय : यूपीएससी/एमपीएससी स्पर्धा परीक्षेसंदर्भात मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यास परवानगी मिळणेबाबत.

महोदय,

''ज्ञानातून सक्षमीकरण'' हे ब्रीद स्वीकारून 'द युनिक अ‍ॅकॅडमी'ने आपल्या स्थापनेपासून यूपीएससी व एमपीएससी परीक्षा मार्गदर्शन क्षेत्रात नवा ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांना यूपीएससी व एमपीएससी परीक्षा आपल्या कवेत येणारी वाटावी यासाठी संस्थेने विविध उपक्रमाद्वारे या परीक्षेसंबंधी एक व्यापक जागृती अभियानच राबवले आहे. या परीक्षेचे नेमके स्वरूप, आवश्यक अभ्याससाहित्य आणि यशस्वी होण्यांसाठी खात्रीशीर अभ्यास पद्धती विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करु इच्छितो.

तरी आपण आमच्यां संस्थेला आपल्या महाविद्यालयात कार्यशाळा घेण्यास परवागनी द्यावी ही विनंती.

तसेच, आमच्या संस्थेने या परीक्षेसाठी निर्माण केलेले अभ्यास साहित्य आपल्या महाविद्यालयाला व विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात द युनिक अ‍ॅकॅडमीतर्फे उपलब्ध करून देण्यात येईल.

सोबत : व्याख्यानाचे प्रकार या विषयाचे पत्र देत आहोत.

आपला

( सुरेश साळवे )
मो. नं. ९४२०३३६६६७
ईमेल -sureshsalve75@gmail.com

( मधुर पोफळे )

*Permission Letter from Unique Academy Pune*



हॅलो यवतमाळ

शहर/ग्रामीण

लोकमत बुधवार, दि. १८ जानेवारी २०१७ ३

## व्हिजन फॉर करिअर कार्यशाळा

दारव्हा : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय व्हिजन फॉर करिअर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सहकारमहर्षी माजी आमदार बाळासाहेब घुईखेडकर जयंती महोत्सवानिमित्त आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.एम.जी. चांदेकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महसूल राज्यमंत्री संजय राठोड होते. प्रमुख पाहुणे कुलसचिव डॉ.अजय देशमुख, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.गणेश मालटे, विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, नेहरु शिक्षण संस्था नेरचे अध्यक्ष परमानंद अग्रवाल, डॉ. संगीता घुईखेडकर, ॲड. शंकरराव राठोड, उत्तमराव शेळके, प्राचार्य विलास राऊत, उपप्राचार्य अजय दुबे, प्राचार्य डॉ. ए.पी. जाधव उपस्थित होते.

डॉ.संजय रघटाटे (नागपूर), मधुकर पोकळे (औरंगाबाद) यांनी रोजगाराच्या संधीची उपलब्धता, स्पर्धा परीक्षा, मुलाखततंत्र, मॉडर्न बिझनेस कम्युनिकेशन यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाचा हा एक भाग होता. (तालुका प्रतिनिधी)

***Vision for Career workshop News Published By Lokamat Marathi News Paper***

**2017-2018**

## 1.Vision For Career Workshop 2017-18




Handbill of *Vision for Career workshop* Programme



*Vision for Career one Day University Level Workshop organized by College*



# दारव्हा येथे व्हिजन फॉर करिअर कार्यशाळा

दारव्हा : येथील मुंगसाजी महाविद्यालयात एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय व्हिजन फॉर करिअर कार्यशाळेचे उद्‌घाटन सोमवारी झाले. उद्‌घाटक म्हणून माजी विधानसभा उपाध्यक्ष प्रा. वसंत पुरके होते.

प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ.संतोष ठाकरे, संस्थेचे संचालक उत्तमराव शेळके, प्राचार्य डॉ.संगीता घुईखेडकर, डॉ. विलास राऊत, प्रिया कडव, प्रा.खुशाल ढवळे, प्रा. सुनील डंभारे आदींची उपस्थिती होती.

यावेळी करिअर घडविण्यासाठी आत्मविश्वास वाढविणे गरजेचे असून त्यासाठी युवा वर्गाने स्वतःवर प्रेम करून निरुत्साह झटकून टाकावा, असे प्रतिपादन प्रा. वसंत पुरके यांनी केले. तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, रोजगाराच्या संधी व विविध योजनांची माहिती आज उपलब्ध होणे गरजेचे असून त्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर म्हणाले.

यावेळी डॉ. प्रवीण महामुनी, प्रा. प्रमोद ससाने, निखील अगवाण, डॉ. सुनील चकवे आदींनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. (तालुका प्रतिनिधी)

***News Published By Deshonnati Marathi News Paper***

**2018-2019**

1.Employment Base Skill Development Workshop Sagar Dharmadhikari, Nashik




*Principal Dr. V.B.Raut felicitated to Sagar Dharmadhikari by flower*



*Sagar Dharmadhikari delivered his speech to Students*



*Participants for Workshop*

## 2.Self Employment and Entrepreneurship Development Camp:




*Self Employment and Entrepreneurship Development Camp organized by College*





| वेळ | विषय | प्रमुख अतिथी व तज्ञ |
|---|---|---|
| १२.०० ते १.०० | दुग्ध व्यवसाय व दुग्ध प्रक्रिया तंत्रज्ञान | मा.डॉ.श्री.गिरीष पंचभाई सहा.प्रा. पशुधन उत्पादन व व्यवस्थापन स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला |
| १.०० ते २.०० | भोजन अवकाश | ----- |
| २.०० ते ३.०० | उद्योग व्यवस्थापन व नियोजन | डॉ. नंदकुमार दुपडे मानसिक परिवर्तन प्रशिक्षक, सोलापूर |
| ३.०० ते ४.०० | पशु व्यवस्थापन व नियोजन | डॉ. दिगांबर रेखाते सेवानिवृत्त प्राध्यापक (न्युट्रीशन ) स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला |
| ४.०० ते ५.०० | इच्छानिहाय चर्चा सत्र (FeedBack) | |
| ५.०० ते ६.०० | समारोपीय कार्यक्रम | मा.श्री.वसंतराव घुईखेडकर यांचे शुभ हस्ते प्रमाणपत्र वितरण सोहळा |

सहकार महर्षी माजी आमदार स्व. बाळासाहेब घुईखेडकर
यांच्या **जयंती महोत्सवा** निमीत्य
विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा,
स्व. बाळासाहेब घुईखेडकर फाउंडेशन व
सिध्दी विनायक ग्रुप अमरावती यांचे सयुक्त विद्यमाने

# स्वयंरोजगार व उद्योजकता विकास शिबीर

सहभाग

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला**

**दि. १० व ११ जानेवारी २०१९ वेळ : सकाळी १० वा.**
**स्थळ : मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**

## ।। निमंत्रण पत्रिका ।।

प्रति,
श्री / श्रीमती ____________________

* **विनीत** *
**वसंत घुईखेडकर**
मुख्य आयोजक तथा अध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा

**अतुल घुईखेडकर**
अध्यक्ष, सिध्दीविनायक ग्रुप अमरावती

**प्रा.डॉ.सौ.संगिता घुईखेडकर**
सचिव, विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा



सहकार महर्षी माजी आमदार **स्व. बाळासाहेब घुईखेडकर** यांच्या जयंती महोत्सवा निमीत्य विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा व स्व. बाळासाहेब घुईखेडकर फाउंडेशन, सिध्दी विनायक ग्रुप अमरावती यांचे सयुक्त विद्यमाने स्वयंरोजगार व उद्योजकता विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या शिबीराला आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

*कार्यक्रमाचे अध्यक्ष :* **मा.आ.श्री.मनोहरभाऊ नाईक**
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

*कायक्रमाचे उद्घाटक:* **मा.आ.श्री.ख्वाजा बेग**
सदस्य विधान परिषद, महाराष्ट्र राज्य

*प्रमुख अतिथी :* **मा.श्री.संदिप बाजोरीया** माजी आमदार
**मा.प्राचार्य श्री. प्रशांतराव पाटील**
संदिप फाउंडेशन, नाशिक
**मा.श्री.नानाभाऊ गाडबैले**
**मा.ॲड.श्री. शंकररावजी राठोड**
माजी अध्यक्ष मार्केटींग फेडरेशन, मुंबई
**मा.श्री.उत्तमरावजी शेळके**
माजी उपाध्यक्ष जि.प.यवतमाळ
**मा.डॉ.महेन्द्र लोढा**
**मा.श्री.शिवाजीराव झोंबाडे** उद्योजक, अमरावती
**मा.श्री.प्रदिप देशमुख** उद्योजक, औरंगाबाद तथा उपाध्यक्ष रुरल चेंबर ऑफ कॉमर्स, दिल्ली
**मा.डॉ.श्री. हेमंत बिराडे** अधीष्ठाता,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला

* **व्दितीय सत्र** *
गुरुवार दिनांक १० जानेवारी २०१९
वेळ दुपारी २.३० ते ५.३०

| वेळ | विषय | प्रमुख अतिथी व तज्ञ |
|---|---|---|
| २.३० ते ३.३० | मिनी दालमील, कृषी प्रक्रिया उद्योग | मा.डॉ.श्री.पी.ए.बोरकर संशोधक अभियंता, कापणी पश्चात तंत्रज्ञान योजना डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला |
| ३.३० ते ४.३० | शेळी पालन उद्योग व व्यवस्थापन | मा.डॉ.श्री.सुनित वानखडे सहा.प्रा. स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला |
| ४.३० ते ५.३० | हर्बलशेती व वन औषधी प्रक्रिया उद्योग | मा.श्री.उदयराज सिंह राजपूत संचालक हर्बल उद्योग, औरंगाबाद |

* **तृतिय सत्र** *
**शुक्रवार दिनांक ११ जानेवारी २०१९**
वेळ सकाळी १० ते सायं. ५.३०

| वेळ | विषय | प्रमुख अतिथी व तज्ञ |
|---|---|---|
| १०.०० ते ११.०० | व्यवस्थापन व नियोजन टेक्सटाईल उद्योग(कपडा व्यवसाय) | मा.श्री. प्रदिप देशमुख उपाध्यक्ष रुरल चेंबर ऑफ कॉमर्स, इंडीया |
| ११.०० ते १२.०० | कोंबडी पालन व्यवसाय व व्यवस्थापन | मा.डॉ.श्री.सतिष मनवर सहा.प्रा.कुक्कुट शास्त्र विभाग स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला |



# ।। निमंत्रण पत्रिका ।।

सहकार महर्षी माजी आमदार स्व. बाळासाहेब घुईखेडकर यांच्या जयंती महोत्सवा अंतर्गत विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा व स्व. बाळासाहेब घुईखेडकर फाऊंडेशन, सिध्दी विनायक ग्रुप अमरावती यांचे सयुक्त विद्यमाने

## स्वयंरोजगार व उद्योजकता विकास शिबीर

सहभाग

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

**दि. १० व ११ जानेवारी २०१९ वेळ सकाळी १० वा**
**स्थळ : मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**

श्री / सौ. ____________________

आपणास कळविण्यात येते की यावर्षी स्वयंरोजगार व उद्योजकता विकास दोन दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

*कार्यक्रमाचे अध्यक्ष* : **मा. आ. श्री. मनोहरभाऊ नाईक** माजी मंत्री महाराष्ट्र राज्य

*कार्यक्रमाचे उद्घाटक* : **मा. आ. श्री. ख्वाजा बेग** सदस्य विधान परिषद महाराष्ट्र राज्य

*प्रमुख अतिथी* : **मा. श्री. संदिप बाजोरीया** माजी आमदार

**मा. प्राचार्य श्री. प्रशांतराव पाटील** संदिप फाऊंडेशन, नाशिक

**मा. श्री. नानाभाऊ गाडबैले**

**मा. ॲड. श्री. शंकररावजी राठोड** माजी अध्यक्ष मार्केटींग फेडरेशन, मुंबई

**मा. श्री. उत्तमरावजी शेळके** माजी उपाध्यक्ष जि.प. यवतमाळ

**मा. डॉ. श्री महेन्द्र लोढा**

**मा. श्री. शिवाजीराव झोंबाडे** उद्योजक, अमरावती

**मा. श्री. प्रदिप देशमुख** उपाध्यक्ष रूरल चेंबर ऑफ कॉमर्स, दिल्ली

**मा. श्री. हेमंत बिराडे** अधीष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला

### विनीत

**श्री वसंत घुईखेडकर**
अध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा

**डॉ. सौ. संगिता घुईखेडकर**
सचिव, विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा

**श्री. अतुल घुईखेडकर**
अध्यक्ष, सिध्दी विनायक ग्रूप, अमरावती

**डॉ. विलास राऊत**
प्राचार्य, मुंगसाजी महाराज महाविद्याल, दारव्हा



सिध्दी विनायक ग्रुप, अमरावती व मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा
यांच्या सयुक्त विद्यमाने

# स्वयंरोजगार व उद्योजकता विकास शिबीर

सहभाग
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

**दि. १० व ११ जानेवारी २०१९**
**स्थळ : मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**

देशातील बेरोजगारी ही फार मोठी गंभीर समस्या झाली असून खाजगिकरण, उदारीकरण, जागतिकीकरण व संगणकाच्या वाढत्या वापरामुळे युवकांच्या हाताला काम मिळणे कठीण झाले आहे. लोकसंख्या वाढ व यांत्रिकीकरणामुळे नोकरीची मागणी आणि उपलब्धता यात मोठी दरी निर्माण झाली आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात सुशिक्षीत बेराजगार युवकांना शासकीय असो किंवा निमशासकीय नोकरी मिळणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत आपली आर्थिक बाजू सक्षम कण्यासाठी युवकांनी काय करावे प्रश्न त्यांच्या समोर उभा आहे. त्या दृष्टीकोनातून स्वयंरोजगार चळवळ राबवून बेरोजगार युवकांची मानसिकता उद्योगीय करुन स्थानिक पातळी वर स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्याच्या दृष्टीने व युवकांच्या उज्वल भविष्याकरिता सिध्दी विनायक ग्रुप, अमरावती ही संस्था महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील तालुका स्तरावर स्वयंरोजगार व उद्योजकता विकास शिबीर प्रकल्प राबवित आहे

भारतात दरवर्षी १ कोटी युवक/युवती शैक्षणिक क्षेत्रामधून शिक्षण घेवून बाहेर पडतात. या मध्ये पदवीधर ३० लाख, दहावी व बरावी होणारे युवक/युवतीची संख्या जवळपास ७० लाख या प्रमाणात आहेत. आजची शिक्षण प्रणाली ही बेरोजगारांचे कारखाने निर्माण होण्यास कारणीभूत ठरत आहे. या वर वेळींच आळा घालून बेरोजगारा युवकांना योग्य दिशा देण्याची नितांत गरज आहे.

दारव्हा तालुकाक्यातील ग्रामिण भागामध्ये बेरोजगारी मोठया प्रमाणात आहे. यामध्ये सुशिक्षीत, अर्धशिक्षीत व अशिक्षीत युवक/युवतींचा समावेश आहे. या सर्व घटकांना स्वयंरोजगाराच्या मुख्य प्रवाहामध्ये आणून त्यांची मानसिकता उद्योगीय करुन स्थानिक पातळीवर उद्योगाच्या व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण कारण्याच्या दृष्टीने सिध्दी विनायक ग्रुप, अमरावती व मुंगसाजी महाराज महाविद्यालय,दारव्हा यांच्या सयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आणि डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांच्या सहभागाने दि.१० व ११ जानेवारी २०१९ रोजी वेळ सकाळी १०.३० वाजता स्थळ : मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा येथे दोन दिवशीय स्वयंरोजगार व उद्योजकता विकास शिबीर आयोजित करण्यात आले आहे

दोन दिवसीय शिबीरामध्ये स्वयंरोजगार व उद्योगीय मार्गदर्शन, सेवा उद्यागे, गृहउद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, स्थानिक पातळीवरील स्वयंरोजगाराच्यासंधी, बाजारपेठ व विक्री व्यवस्थापन, व्यक्तिमत्व विकास, शासकीय व निमशासकीय अनुदान योजनांची माहिती संबंधित तज्ञ मार्गदर्शक शास्त्रज्ञाव्दारे आपणास दिली जाईल. तरी आपल्या परिसरातील सर्व बेरोजगार युवक/युवतींनी व महिला बचत गट सभासदांनी शिबीरामध्ये सहभागी होण्याकरीता सभासद अर्जाव्दारे आपले नांव नोंदणी करुन दोन दिवशीय स्वयंरोजगार व उद्योजकता विकास शिबीराकरीता उपस्थित राहावे.

## शिबीरार्थी नोंदणी

**नोंदणी दिनांक : दि. ४ ते ९ जानेवारी २०१९ पर्यंत वेळ सकाळी ११ ते ५ पर्यंत**
**स्थळ : मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**

टिप : * शिबीरामध्ये नोंदणी करण्याकरीता सभासद अर्जासोबत खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.
* दोन पासपोर्ट फोटो, मतदान कार्ड, आधार कार्ड, जातीचा दाखला, मार्कलिस्ट, टी.सी.ची.छायाप्रत इत्यादी
* दोन दिवसाय स्वयंरोजगार व उद्योजकता विकास शिबीरामध्ये सहभागी शिबीरार्थींना प्रमाणपत्र देण्यात येईल.
* दोन दिवसीय शिबीर कालावधीमध्ये व उद्योजकता विकास शिबीरार्थींची भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.

Handbill of *Self Employment and Entrepreneurship Development Camp*

**2019-2020**

**1.Job Fair :- Mungsaji Maharaj Mahavidyalaya Darwha and District skill development, Employment and Model career center Yavatmal Jointly Organized Job Fair Programme**




Handbill of *Job Fair*

सुवर्ण संधी    महाराष्ट्र शासन    सुवर्ण संधी

National Career Service

## जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र

मॉडल करीअर सेंटर, यवतमाळ तथा मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा यांच्या संयुक्त विद्यमाने

# पंडीत दीनदयाल उपाध्याय भव्य रोजगार मेळावा

**दिनांक : १०/०१/२०२०**
*** वेळ ***
**सकाळी ९.३० ते ४.०० वाजता**

**।। स्थळ ।।**
**मुंगसाजी महाराज महाविद्यालय**
**दारव्हा**

उमेदवारांनी मेळाव्यात उपस्थित राहण्यासाठी ऑनलाईन सहभाग (Participation) नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय निवड चाचणीत सहभागी होता येणार नाही याची नोंद घ्यावी. ऑनलाईन अर्ज करण्यात काही अडचण आल्यास या कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
**मेळाव्यात ऑनलाईन सहभाग नोंदविण्याची पध्दती मागील पानावर दिली आहे.**

| अ.क्र. | कंपनीचे नाव व पत्ता | ठिकाण | एकूण पदे | पदाचे नांव | शै.पात्रता | वेतन | वय | खोली क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिपला इंडिया लि. | कृरकुंभ MIDC पुणे | २०० | अप्रेन्टीस | १२ वी | १०,२००/- | २०-३५ | १ |
| २ | किंडर इंडिया प्रा.लि. | संन्सवाडी पुणे | २०० | अप्रेन्टीस | १० व १२ वी पास नापास डिप्लोमा मेकॅनीक | ९०००+/- | २०-३५ | २ |
| ३ | इंनोवा रुबर इं प्रा.लि. | नाशिक | १०० | अप्रेन्टीस | BA/B.Com BSC | ९०००+/- | २०-३५ | ३ |
| ४ | मॅक व्हेईकल्स प्रा.लि | यवतमाळ | ६० | Tgm (Tata Gramin Mitra) | १० व १२ वी आय टी आय | पदानुसार | २०-३५ | ४ |
| ५ | जय ॲग्रोवन जय ॲग्रो इंडस्ट्रीज, | यवतमाळ | १५ | रिपोर्टर, ट्रॅक्टर मेकॅनिक, ऑपरेटर इलेक्ट्रीशीयन | पदवीधर आय टि आय | पदानुसार | २०-३५ | ५ |
| ६ | न्यू स्टार सेक्यूरीटी | यवतमाळ | २० | शेक्यूरीटी गार्ड | ८ वी पास | पदानुसार | २०-३५ | ६ |
| ७ | नवकिसान बायोप्लॅनटेक | जळगांव | ४० | फिल्ड ऑफीसर | १२ वी पदवीधर | पदानुसार | १९-३५ | ७ |
| ८ | भारत जॉर्ज लि. | बारामती पुणे | २०० | अप्रेन्टीस | बि.ई डिप्लोमा आय टि आय | १२५००/- | १८-२६ | ८ |
| ९ | इमिटेक कॉटिनेंल इंडिया प्रा.लि. | तळेगांव पुणे | १०० | निम | डिप्लोमा मेकॅनिकल इलेक्ट्रीकल इलेक्ट्रॉनिक | १२०००/- | २०-३५ | ९ |
| १० | एमप्लीलॉन इंडिया | भोसरी पुणे | १०० | अप्रेन्टीस | आय टि आय फिटर टर्नर मेकॅनिष्ठ | १०५००/- | २०-३५ | १० |

**आवश्यक कागदपत्रे :** सेवायोजन कार्ड, निवडणूक ओळखपत्र/आधारकार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या प्रती, ५ पासपोर्ट फोटो, बायोडाटा.

**संपर्क :** १) सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, उद्योग भवन, तीसरा व चौथा माळा, दारव्हा रोड, यवतमाळ. फोन - ०७२३२-२४४३९५.

**सुचना :** खाजगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी, मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण देणाऱ्या सुचीबध्द प्रशिक्षण संस्थांची यादी आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वंय रोजगारासाठी कर्ज याबाबतच्या अधिक माहितीसाठी www.mahaswayam.gov.in/www.ncs.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

*Participated companies and their vacancies details*



Company Officials Interview for the job




Shri Vasant Ghuikhedkar Delivered his speech to students and unemployed Youth




Banner of Programme

## Session 2020-2021

**1.Title of Practice: - Career Oriented Activities (Vision for Currier)**

Venue of Activity:- Virtual Mode (Zoom Platform)

Date & Time – 24 April To 24 May 2021 Time:- 4:00 to 5:00 P.M.









**2.Title of Practice: - Career Oriented Activities (Vision for Currier)**

Venue of Activity:- Virtual Mode (Zoom Platform)

Date & Time – 31 July 2021 To 17 Aug. 2021





Vidya Prasarak Mandal, Darwha

# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDYALAYA

Darwha, Dist.Yavatmal (M.S.) (Email - mmcollegedarwha@gmail.com)
(Arts, Commerce, Science & H.S.C.V.)
Accredited by NAAC with 'B' grade

- President -
Shri.Vasant Ghuikhedkar
Yavatmal. Ph.No. 07232-250345

- Principal -
Dr.V.B.Raut
Ph.No. 07238-254245 (O.)

**DEPARTMENT OF PHYSICS in collaboration with I. Q. A. C. organized**

***University Level***
***Virtual***
***Career Guidance Talk Series***

***From 31st July 2021to 17th August 2021***

**Session 2020-21**

| In-charge Teacher | I. Q. A. C. Coordinator | Head of Department | Principal |
|---|---|---|---|
| (Prof. D. D. Kothekar) | (Dr. P. D. Bageshwar) | (Dr. K. K. Hurde) | (Dr. V. B. Raut) |

## ***ABOUT THE SERIES***

**Aim : To enhance awareness among the students regarding diverse career opportunities.**

***Objectives***

- *Career guidance helps students to reflect on their ambitions, interests, qualifications and abilities.*
- *A comprehensive, developmental program designed to assist individuals in making and implementing informed educational and occupational choices.*
- *It helps them to understand the labour market and education systems and to relate this to what they know about themselves.*
- *To help in the total development of students.*
- *To help in the proper choice of courses.*
- *To help in the proper choice of careers.*
- *To help the students in vocational development.*
- *To develop readiness for choices and changes to face need challenges.*
- *To minimize the mismatching between education and employment and help in the efficient use of manpower.*
- *To motivate the youths for self-employment.*
- *To help fresher's establish proper identity.*
- *To identify and motivate the students from weaker sections of society.*
- *To help the students in their period of turmoil and confusion.*
- *To identify the students in need of special help.*

- **Registered Students = 449**
- **Career Guidance by 08 Different Resource Persons on 08 attracting Fields**




***MEMORABLE MOMENTS***











## *Certificate of Completion*

This certifies that

**Aachal Rajesh Jaiswal**

has successfully completed the online certificate course on ***"Aptitude and Reasoning"*** organized by Department of Physics, Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha during ***24th April 2021 to 24th May 2021.***

| Miss. D. D. Kothekar | Dr. K. K. Hurde | Dr. V. B. Raut |
|---|---|---|
| Assistant Professor | Professor and Head | Principal |
| Deptt. of Physics | Deptt. of Physics | Mungasaji Maharaj Mahavidyalaya |

***NEWS***

**लोकमत**

# दारव्हात व्हर्चुअल करियर गाईडन्स टॉक

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : विद्यार्थ्यांना भविष्यात उपलब्ध असलेल्या व्यवसायाच्या संधीबाबत मार्गदर्शन मिळण्यासाठी येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभाग व आयक्युएसी यांच्या वतीने विद्यापीठ स्तरीय व्हर्चुअल करियर गायडन्स टॉक सिरिजचे आयोजन करण्यात आले होते.

व्याख्यानमालेचे उद्घाटन डॉ. पृथ्वीराजसिंग राजपूत यांनी केले. अध्यक्षस्थानी डॉ. संगीता घुईखेडकर होत्या. प्राचार्य डॉ. विलास राऊत, डॉ. किशोर हुरडे, डॉ. प्रशांत बागेश्वर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी डॉ. राजपूत यांनी 'रसायनशास्त्रातील संधी' यावर मार्गदर्शन केले. आठ दिवस चाललेल्या या सिरिजमध्ये आठ व्याख्यान झाले. तारानी कुमार (जपान), प्रा. राहुल मापार, विशाल लथ्थे, नाशित खान, परश्राम आखरे, डॉ. यादवकुमार मावळे, आदित्य शेंडे आदी वक्त्यांनी विद्यार्थ्यांना जापनीज कंपन्या, गणित, मॅनेजमेंट फिल्ड, कॉम्प्युटर सायन्स, उद्योजकता, भूगर्भशास्त्र व भौतिकशास्त्र अशा विविध क्षेत्रातील उपलब्ध व्यवसायाच्या संधीविषयी मार्गदर्शन केले.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास राऊत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे, डॉ. किशोर हुरडे, डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. चांडक प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. राऊत, डॉ. चकवे, डॉ. चांडक यांनी विचार मांडले. या मलिकेत विविध महाविद्यालयातील ४४९ विद्यार्थी सहभागी झाले होते. संचालन प्रा. धनश्री कोठेकर, तर आभार डॉ. बागेश्वर यांनी मानले. या सिरिजमध्ये अमरावती विभागातील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

Hello Yavatmal
Page No. 3 Sep 02, 2021
Powered by: erelego.com